पोलीस अधीक्षक, कार्यालय गडचिरोली
जनसंपर्क शाखा
P.R.O Office, Gadchiroli
**Phone No.** 07132223142 **Address:** SP Office,Gadchiroli
**E-mail** : prospoffice.gadchiroli@gmail.com


# वार्तापत्र

दिनांक २४/०७/२०१९

## मुरुमगाव येथे आरोग्य मेळावा संपन्न

उपविभाग धानोरा अंतर्गत येणाऱ्या पोलीस मदत केंद्र मुरुमगाव येथे नागरीकांच्या आरोग्य तपासणीसाठी आरोग्य मेळावा आयोजित करण्यात आला होता. सदर मेळाव्यास अपर पोलीस अधिक्षक प्रशासन गडचिरोली मोहीतकुमार गर्ग साो, सीआरपीएफ ११३ बटालीयनचे असिस्टंट कमांडर मीना साो. पोलीस स्टेशन प्रभारी अधिकारी राजु थोरात तसेच आरोग्य तपासणी करिता आरोग्य केंद्र मुरुमगाव येथील डॉ. सतीश जांभुळे हे स्टॉफ सह उपस्थित होते. सदर मेळाव्यास मोठ्या प्रमाणावर विद्यार्थी, महिला व जेष्ठ नागरीकांनी उपस्थिती दर्शविली होती.

आदीवासी समाजातील होतकरु विद्यार्थी नामे लोकेश सपनलाल मार्गीया हा सरकारी कोट्यातुन MBBS च्या प्रथम वर्षाकरिता पात्र ठरला होता परंतु घरची परिस्थिती बिकट असल्याने त्याला प्रथम वर्षाची फी भरण्यास अडचण येत होती. सदर बाब त्याने स्थानिक गडचिरोली पोलीसांना सांगितल्यानंतर त्याच्या प्रथम वर्षाची फी त्याच्याकडे या मेळाव्या निमित्याने सुपुंर्द करण्यात आली. यावेळी बोलतांना त्यांने पोलीस दलाचे आभारे मानत आदीवासी समाजातील इतर युवकांनी देखील शिक्षणाकडे वळावे शिक्षण हेच आपले तारणहार असल्याचे त्याने सांगुन डॉक्टर होवुन आपण आदिवासी समाजासाठी कार्य करणार असल्याची इच्छा असल्याचे बोलुन दाखविले.

